# जनसंपर्क अधिकारी
**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १८४-२३** **दिनांक ०९/०६/२०२३**

## ४ करोड रुपयांची खंडणी मागणा-या ३ सख्या भावांना १२ तासाचे आत अटक. पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०२/०६/२०२३ रोजी दुपारी ०२:०० वाजता फिर्यादी यांना आरोपीत विजय शंकर व डेव्हीड यांनी मिळुन पॉवर प्रेसचे मशिन दाखवण्याचे उद्देशाने तुंगारेश्वर येथुन फिर्यादीचे गाडीतुन कोपर, मांडवी येथे घेवुन जावुन त्यास सुमारे ७ तास बंधक बनवुन फिर्यादीचा गळा दाबुन चाकुचा धाक दाखवुन ४ करोड रुपयाची खंडणी मागुन तडजोडी अंती २५ लाख रुपयाची खंडणी देण्याचे ठरले नंतर आरोपीत यांनी फिर्यादी जवळ असलेले रोख १५,०००/- रुपये व ए.टी.एम. मशिन मधुन २५,०००/- रुपये अशी रोख रक्कम जबरदस्तीने घेवुन पोलीसांना कळविले अथवा ठरलेले पैसे दिले नाही तर फिर्यादीचे पत्नीस व मुलांना मारुन टाकु अशी धमकी दिलेबाबत फिर्यादी नामे श्री. मनोज आत्माराम त्रिवेदी, रा. मालाड पुर्व, मुंबई यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पेल्हार पोलीस ठाणेत गु.रजि. नं. I ५३०/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३६४(ए), ३८४, ३८५, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन सदर गुन्हा उघडकीस आणण्याकरीता वरिष्ठांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना व मार्गदर्शन केले होते. त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी खान कंपाऊन्ड, पेल्हार येथे सापळा रचून आरोपीत नामे १) पद्युम्न मुन्नालाल गुप्ता ऊर्फ डेव्हीड, वय २४ वर्षे, २) प्रदीपकुमार मुन्नालाल गुप्ता ऊर्फ विजय शंकर, वय ३१ वर्षे, ३) अनुपकुमार मुन्नालाल गुप्ता, वय २० वर्षे, सर्व रा. साई चाळ, उमर कंपाऊन्ड, सांगपाडा, नालासोपारा पुर्व मुळ रा. ता. मेजा, जि. प्रयागराज, राज्य उत्तरप्रदेश यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन गुन्हयातील २९,०००/- रुपये रक्कम मोबाईल फोन, चाकु, वॉकीटॉकी असा एकूण ३६,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सदर गुन्हयाच्या तपासात मुख्य सुत्रधार आरोपीत क्र. १ असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.नि. श्री. महेंद्र शेलार (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अंम.रवि वानखेडे, किरण आव्हाड, निखिल मंडलिक, संजय मासाळ, अनिल साबळे, दिलदार शेख तसेच पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३, विरार कार्यालयातील पो.हवा. नामदेव ढोणे, पो.अंम. सोहेल शेख यांनी केली आहे.




----oooo----